पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड,सिव्हील लाईन,वाशिम, ता जि वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in

प्रेस नोट

दिनांक.२१/१०/२०२१

## वाशिम जिल्हा पोलीस दलातर्फे पोलीस शहीद स्मृतीदिन पाळण्यात आला.

२१ ऑक्टोंबर १९५९ भारतीय सरहददीवर शेजारीच असणा–या चीन देशाने हल्ला केला. तेव्हा भारतीय सिमेवर आवश्यक तेवढे सैन्य नेमले गेले नव्हते. त्यामुळे चीनी सैन्य विनासायास आत घुसत होते. त्याला तैनातीस असलेल्या भारतीय जवानांनी प्रखर विरोध केला. पुर्णपणे तयारी करून आलेल्या चीनी लष्काराच्या पुढे आपण कमी पडणार आहोत. आपण संपणार आहोत ही जाणीव असुन ही कालबाहय झालेल्या शस्त्र व सामुग्रीनिशी जवान झुजंत राहले धर्योने तोंड देवुन शर्तीचे प्रयत्न केले. अखेर कर्तव्यावरील आपले सैनीक धारातिर्थी पडले देशाच्या सिमा संरक्षणासाठी सर्व प्रथम बलीदान दहा शौर्यवान पोलीसांनी केले त्यांनी केलेल्या या त्यागाचे, प्राण समर्पणाचे स्मरण म्हणुन संपुर्ण देशात दरवर्षी २१ ऑक्टोंबर हा दिवस स्मृती दिन म्हणुन पाळण्यात येतो. या दिवशी संपुर्ण देशात कर्तव्य बजावत असतांना प्राणर्पण करणा–या सर्व जवानांना स्मरण करून मानवंदना देण्यात येते.

आज दिनांक २१ऑक्टोंबर २०२१ रोजी संपुर्ण वर्षात आपले कर्तव्य बजावत असतांना ज्या जवानांना विर मरण प्राप्त झाले त्यांना सतत स्मरणार्थ ठेवण्याकरीता स्मृती दिन कार्यक्रमाचे आयोजन नविन पोलीस मुख्यालयाचे मैदानावर करण्यात आले त्यावेळी स्मृती चिन्हास पुष्पचक्र अपर्ण करुन शहिद जवानाना मानवंदना देण्यात आली. सदर कार्यक्रमाला वाशिम जिल्हयाचे जिल्हाधिकारी श्री.शण्मुगराजन एस, पोलीस अधिक्षक,श्री बच्चन सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. यशवंत केडगे, प्रभारी पोलीस उप अधिक्षक तथा पोलीस निरिक्षक स्थानिक गुन्हे शाखा वाशिम सोमनाथ जाधव,व इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच शहरातील प्रतिष्ठीत नागरीक हजर होते. त्यांचे उपस्थितीत वाशिम जिल्हा पोलीस दलाचे प्लाटुन ने चालु वर्षात शहीद झालेल्या जवानांमध्ये एकुण ५२ अधिकारी आणि ३२५ अंमलदार यांना मानवंदना देण्यात आली.

मार्फत :– मा. जिल्हा माहिती अधिकारी

पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा,वाशिम